# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर। **P.S.(ठाणे):** संगमनेर शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0697 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**20/07/2026 13:33

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 22/05/2025
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 22/05/2025
**Time From (वेळेपासून):** 15:45 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:04 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 20/07/2026 **Time (वेळ):** 13:23 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 031
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/07/2026 13:23 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** मेडीकव्हर हास्पीटल, संगमनेर, संगमनेर,

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



CamScanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** छाया कडु देवरे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल,अहिल्यानगर,संगमनेर शहर , अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल,अहिल्यानगर,संगमनेर शहर , अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8788215086

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुभाश दगडु धादवड | | | 1. घुलेवाडी फाटा, राजापुर रोड, संगमनेर ,संगमनेर शहर , अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | सुजित दामोदर गायकवाड | | | 1. मालवड रोड, संगमनेर, तासंगमनेर,संगमनेर ,संगमनेर शहर ,अहिल्यानगर,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**



CS CamScanner

**Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**0 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**1.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि.20/07/2026 मी छाया कडु देवरे, वय-37 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर, मो.नं.8788215086 समक्ष संगमनेर शहर पोलीस ठाणेस हजर राहुन सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देते की, मी दिनांक 22/05/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे हजर असताना 09/30 वा चे सुमारास दि.21/05/2025 रोजी गोपनिय कामकाजाकरिता प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, अहिल्यानगर यांचेशी पत्रव्यवहार करून उपलब्ध करुन घेतलेले दोन पंच आमच्या कक्षात हजर झाले त्यावेळी आम्ही त्यांना कळविले की, एका तक्रारदार यांची लाच मागणीची तक्रार असुन, सदरचे तक्रारदार हे संगमनेर येथे सुरक्षित ठिकाणी भेटणार आहेत. आपणास तेथे जावुन त्यांची तक्रार ऐकुन त्याप्रमाणे लाचेची सापळा कारवाई करावयाची आहे. त्या कारवाईत तुम्ही पंच म्हणुन काम करण्यास तयार आहात काय? अशी संमती विचारली असता त्यांनी त्यास संमती दर्षविली. तसेच आम्ही कार्यालयात हजर असलेले पोकाॅ. सचिन सुदुक व पोकाॅ.गायकवाड यांची पंचांषी ओळख करून दिली. त्यानंतर आम्ही पंच व लापवि कार्यालयतील स्टाफला कळविले की, सदरचे तक्रारदार हे संगमनेर येथे सुरक्षित ठिकाणी थांबणार आहेत, आपणास तेथे जावुन त्यांची भेट घेवुन त्यांची काय तक्रार आहे ते ऐकुन पुढील कारवाई करणे आहे. त्यानंतर आम्ही सोबतचे स्टाफला सापळा कारवाईसाठी लागणारे सर्व साहित्य बरोबर घेणेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही, पंच व सापळा पथकातील कर्मचारी असे सर्व साहित्यासह खाजगी वाहन क्र.एमएच-15 के.सी.8517 ने सकाळी 10ः10 वा. चे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर कार्यालयातुन निघुन नगर मनमाड रोड ने लोणी मार्गे संगमनेर येथे 12ः15 वा. आलो. तेथे आमचे सुचनेवरून पोकाॅ.गायकवाड यांनी सुरक्षित ठिकाणी खाजगी वाहन उभे केले. त्यांनतर आम्ही तक्रारदार यांना त्यांचे मोबाईलवर संपर्क करुन संगमनेर षहरात सुरक्षित ठिकाणी थांबलो असल्याचे कळवुन तेथे येण्यास सांगितले. त्यांनतर तक्रारदार हे त्यांच्या भावासह त्यांचेकडील चारचाकी वाहनाने आम्ही थांबलेल्या ठिकाणी आलो. त्यावेळी आम्ही त्यांना त्यांची नावे विचारले असता, त्यांनीा त्यांची नांवे नामदेव शांताराम पवार, वय-38 वर्षे, धंदा-नोकरी, रा.राजुरी, ता.जुन्नर, जि.पुणे, दिलीप शांताराम पवार, रा.राजुरी, ता.जुन्नर, जि.पुणे असे सांगुन मीच आपणास हाॅस्पीटलच्या बिलींग विभागाविरूध्द लाच मागणीची तक्रार सांगितली होती असे कळविले. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.पवार यांना खाजगी वाहनामध्ये बसण्याच्या सुचना दिल्या असता तक्रारदार श्री.पवार हे खाजगी वाहनात बसले. त्यांनतर आम्ही तक्रारदार श्री.पवार यांचेशी आमची, दोन्ही पंचाची व सापळा पथकातील कर्मचाÚयांची आपसात ओळख करुन दिली. त्यानंतर आमचे सुचनेवरून पंचांनी तक्रारदार यांना त्यांचे पुर्ण नांव, पत्ता व तक्रार विचारता त्यांनी त्यांचे नांव वरील प्रमाणे सांगुन, त्यांची तक्रार थोडक्यात सांगितली की, ''मी वरील ठिकाणी कुटुंबासह रहावयास आहे. माझे सोबत माझे आई वडील राहण्यास आहेत. माझ्या आईला मुतखडयाचा त्रास होत असल्याने मी तीला उपचारकामी आमच्या गावातील वेठेकर हाॅस्पीटल येथे घेवुन गेलो त्यावेळी डाॅक्टरांनी तपासुन सोनोग्राफी करण्यास सांगितले सदरच्या सोनोग्राफी रिपोर्ट मध्ये 10 एम एम चा खडा असल्याचे डाॅक्टरांनी सांगितले व पुढील उपचारकामी संगमनेर मधील मेडी कव्हर हाॅस्पीटल, संगमनेर, जि. अहिल्यानगर येथे जाण्यासमी छाया कडु देवरे, वय-37 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर, मो.नं.8788215086 सांगितले. त्यानंतर मी माझ्या आईला घेवुन संगमनेर मधील मेडीकव्हर हाॅस्पीटल मध्ये आलो. तेथील डाॅक्टर चैतन्य यांना महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत आईच्या उपचारासंबंधी विचारपुस केली असता डाॅ.चैतन्य, डाॅ.तोडकरी, व सुभाष धादवड यांनी



CamScanner

मला सांगितले की, सदरचा आजार हा योजनेत बसतो परंतु त्यासाठी वीस हजारांचे पॅकेज असुन ते तुम्हाला कॅश मध्ये भरावे लागतील. त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, वीस हजार कशाचे लागतील महात्मा फुले जन आरोग्य योजना ही तर शासकीय योजना असुन त्यामध्ये उपचार मोफत केले जातात. त्यावेळी ते म्हणाले की, तुमच्या आईचे आॅपरेशन चांगल्या प्रकारे होणेकरीता त्यांना उत्तम प्रकारच्या अॅटिबायोटिक गोळ्या दयाव्या लागतील त्यासाठी 20,000/- रूपये कॅश दयावे लागतील. त्यावेळी मी त्यांना सदर रक्कम भरलेबाबतचे बील भेटेल का असे विचारले असता त्यांनी सांगितले सदरचे उपचार योजनेमध्ये करावयाचे असुन त्याचे कशाचेच बील, पावत्या वगैरे भेटणार नाही. त्यावेळी माझ्या लक्षात आले की, डाॅ.चैतन्य, डाॅ.तोडकरी, व सुभाष धादवड हे माझ्या आईचे आॅपरेशन महात्मा फुले जन आरोग्य योजनेत करून देणेकरीता माझ्याकडे 20,000/- रूपये लाच मागणी करीत असलेची माझी खाात्री झाली आहे. तरी त्यंाचेवर कारवाई करावी म्हणुन तक्रार सांगुन तक्रारी अर्ज दिला. त्यावेळी तक्रारदार श्री नामदेव पवार यांनी ते डाॅ.चैतन्य, डाॅ.तोडकरी व सुभाश धादवड यांना दि. 22/05/2025 रोजी मेडीकव्हर हाॅस्पीटल, संगमनेर, अहिल्यानगर येथे भेटण्यासाठी जाणार असल्याचे सांगितले. त्यानंतर माझ्या सुचनेवरून तक्रारदार श्री पवार यांनी त्यांची तक्रार पंचांना सांगितली. श्री पवार यांनी सांगितलेली व लेखी तक्रार एकच असल्याची खात्री झालेनंतर मी व दोन्ही पंचांनी तक्रारी अर्जावर सहया केल्या. त्यानंतर तक्रारीच्या अनुशंगाने तक्रारदार श्री पवार, पंच नं.1 श्री रूद्रवंषी व तक्रारदार यांचे भाउ श्री दिलीप पवार यांचेसह डाॅ.चैतन्य, डाॅ.तोडकरी व सुभाश धादवड यांची भेट घेण्यासाठी मेडीकव्हर हाॅस्पीटल, संगमनेर येथे पाठवुन तक्रारदार श्री पवार यांचे तक्रारीप्रमाणे त्यांचेकडे डाॅ.चैतन्य, डाॅ.तोडकरी व सुभाश धादवड हे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची आपण प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगुन पडताळणी करावाईचे अनुशंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या. तसेच षासकीय डिजीटल व्हाईस रेकाॅर्डरचे चालु बंद करण्याचे प्रात्यक्षिक पंचासमक्ष तक्रारदार यांना दाखविले. त्यानंतर माझे, तक्रारदार श्री पवार, तक्रारदार यांचे भाउ श्री दिलीप पवार व दोन्ही पंचांचे निवेदन व्हाईस रेकाॅर्डर मध्ये रेकाॅर्ड केली. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुशंगाने व्हाईस रेकाॅर्डर 15ः45 वाजता चालु करून तो तक्रारदार श्री पवार यांच्या ताब्यात दिला. त्यानंतर तक्रारदार श्री पवार, त्यांचा भाउ श्री दिलीप पवार व पंच नं.1 रूद्रवंषी यांना डाॅ.चैतन्य, डाॅ.तोडकरी व सुभाश धादवड यांची भेट घेण्याकरीता पायी रवाना केले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री पवार, पंच नं.1 रूद्रवंषी व तक्रारदार यांचे भाउ असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले त्यावेळी व्हाईस रेकाॅर्डर 16ः04 वाजता बंद केला.

त्यावेळी प्रथम आम्ही पंच नं.1 रूद्रवंषी यांना डाॅ.चैतन्य, डाॅ.तोडकरी व सुभाश धादवड यांना भेटणेस गेलेनंतर काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी पंच नं.2 मेरूकर यांचे समक्ष सागितले की, "आपण मला, तक्रारदार पवार व त्यांचे भाउ दिलीप पवार यांना सुचना समजावून सांगून डाॅ.चैतन्य, सुभाष धादवड व डाॅ. तोडकरी यांची मेडीकव्हर हाॅस्पीटल, संगमनेर येथे भेट घेण्यासाठी तक्रारदार व त्यांचे भाउ दिलीप पवार यांचे सोबत रवाना केले असता मी, तक्रारदार व त्यांचे भाउ असे पायी चालत जावुन मेडीकव्हर हाॅस्पीटलमधील बिलींग विभागात गेलो. सदर ठिकाणी समोरच उभा असलेल्या इसमाकडे हात करून तक्रारदार मला म्हणाले की हे सुभाष धादवड सर त्यावेळी माझ्या लक्षात आले की हेच ते सुभाष धादवड सर आहेत. त्यावेळी तक्रारदार यांनी धादवड यांना त्यांच्या आईला डिस्चार्ज संबंधी सांगितले. त्यानतर तक्रारदार यांनी सुभाष धादवड यांचेशी माझी व त्यांच्या भावाची ओळख करून देवुन सांगितले की, हे सुभाष धादवड सर आहेत महात्मा फुले योजनेच सगळ बघतात हे... त्यानंतर धादवड यांनी सागितले की, आपण पेशंटच जे स्टेंडिंग करेलं हे..खडा होता..तो नेमकी तुमच्या....किडनीचा आणि ते मुत्रशयाला जे पिशवी असते त्या नळीमध्ये अडकलेला होता..आपण ते सिस्टीमनी करून जी नळी आहे ना किडनीची सुज वगैरे होती..किंवा इन्फेक्शन झालतं..ते कमी केलयं आपण ..ते योजने थ्रो पाच हजारच पॅकेज हे त्याला नाही का..बाकी जे काही गोष्टी आहे ते तुम्हाला पे कराव्या लागतात..तेव्हा आपण हयां सोबत बोललो होतो.. ते म्हणले माझे भाउ येणार आहे. म्हणजे तुम्ही.. त्यांच्यासोबत बोलुन घ्या ते सांगतील तुम्हाला त्यानंतर तक्रारदार यांचे भाउ त्यांना म्हणाले की, योजनेत असल्यावर कस काय असं. त्यावेळी धादवड म्हणाले की ते कस असतं हायर अॅटिबायोटिक दयाव लागत काही गोष्टी असतात त्यानुसार तो खर्च वेगळा असतो. त्यावेळी तक्रारदार यांचे भाउ म्हणाले की, बर पैशे भरतो आम्ही त्याच बील वगैरे काही मिळेल का..? त्यावर धादवड म्हणाले की, त्याच बील वगैरे नाही भेटणार कारण की आपण तुम्हाला योजने थ्रो टाकेल हे, बील देता येवु नाही शकत. त्यानंतर बिलींग विभागातील एक कर्मचारी म्हणाला की, आपण योजनेचा पण पॅक घेतलेला हे गव्हर्नमेंटच अस म्हणनं असत पुर्ण कॅश मध्ये करा नाहीतर पुर्ण योजनेत करा..त्यावेळी तक्रारदार म्हणाले की, मग कस ंबील जर दिल ना काही वाटत नाही त्यावेळी धादवड म्हणाले की, ते कसं असत आता तुमच समजा कॅश मध्ये केल असत तुम्हाला सगळ कॅश मध्ये म्हणजे मेडीकल म्हणा इतर गोष्टी म्हणा किंवा बेड चार्जेस म्हणा तुम्हाला दयावे लागतात. आता आपण बेड चार्ज नाही घेत तुमचं योजने थ्रु हे....आपण दाखवतो गव्हर्नमेंट ला योजने थ्रो..तुमच्या फक्त आॅपरेशन हे तुमच्या



CamScanner

याच्या थ्रु होतं..रियल स्टॅनिंग..बाकी इतर काही गोष्टी असतात..ते हायर अॅटिबायोटिक म्हणा..इतर गोष्टी म्हणा.. तुम्हाला आपल्याला पेड करून घेण गरजेच असतं..त्यावेळी तक्रारदार म्हणाले की आम्ही पैशे भरायला तयार हे फक्त आम्हाला बील दया. त्यावेळी बिलींगमधील कर्मचारी म्हणाला की, सर ऐका ना अॅडमिट करतानाच सांगितलं हे बील वगैरे भेटणार नाही म्हणुन त्यानंतर बिलींग कर्मचारी यांनी तक्रारदार यांच्या आईचे मेडिकलचे व झालेल्या तपासण्या यांचे बील दाखवले व संागितले की, तुमच्या आईच्या मेडीकलचे बील 16853 रूपये झालेले असुन तपासण्या 1090 रूपयांच्या झालेल्या आहेत. त्यावेळी तक्रारदार सुभाष धादवड यांना म्हणाले की, यामध्ये काही कमी होणार नाहीत का तुमच्या मॅनेजमंेटला भेटुन त्यावेळी धादवड म्हणाले की, आमचे मॅनेजर सुजित गायकवाड सर आहेत त्यांना भेटुन तुम्ही त्यांच्याशी बोलु शकता. त्यावेळी आम्ही मॅनेजर सुजित गायकवाड सर यांना भेटण्यासाठी सुजित गायकवाड सर यांच्या कॅबीन मध्ये गेलो. त्यावेळी तक्रारदार त्यांचे भाउ व मॅनेजर सुजित गायकवाड यांच्यात तक्रारदार यांच्या आईच्या उपचारासंबंधी व महात्मा फुले जन आरोग्य योजनेबाबत व पैसे कमी करण्याबाबत चर्चा झाली त्यावेळी मॅनेजर सुजित गायकवाड सर तक्रारदार यांना म्हणाले की ज्यावेळेस तुम्ही अॅडमिट झालात त्यावेळी डाॅ.तोडकरी आणि तुमच्यात काय बोलण झाल ते मला माहित नाही. डाॅ तोडकरी हे आॅपरेशन मध्ये व्यस्त असुन ते खाली आल्यावर मी त्यांचेशी चर्चा करतो मग पुढे काय करायचं ते बघु असे बोलुन तुम्ही अर्धा तासाने परत या संागितले त्यावेळी मी, तक्रारदार पवार असे आम्ही पायी चालत येवुन आपण थांबलेल्या सुरक्षित ठिकाणी परत आलो. अषी हकीकत संागितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री पवार यांना डाॅ.चैतन्य, डाॅ.तोडकरी व सुभाश धादवड यांना भेटणेस गेलेनंतर काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी पंच नं.1 रूद्रवंषी यांचे हकीकतीषी मिळतीजुळती हकीकत संागितली.

पडताळणी कारवाई दरम्यान सुभाष धादवड व मॅनेजर सुजित गायकवाड यांनी तक्रारदार श्री पवार यांच्या आईचे आॅपरेशन व उपचार महात्मा फुले जन आरोग्य योजनेमध्ये करून देणेकरीता 20,000/-रु दयावे लागतील व सदर पैसे दिल्याबाबतचे बिल भेटणार नाही असे संागुन सुभाश धादवड यंानी लाच मागणी केल्याचे निश्पन्न झाले. तसेच तक्रारदार व त्यांचे भाउ पंच नं. 1 यांचेसह सदर हाॅस्पीटलचे मॅनेजर सुजित गायकवाड यांच्या बिलाबाबत विचारणा करण्यासाठी गेले असतां मॅनेजर सुजित गायकवाड यांनी सांगितले की, जे ठरले आहे त्यात कमी होणार नाही. असे म्हणुन सुभाश धादवड यांच्या लाचमागणीस प्रोत्साहन दिल्याचे निश्पन्न झाले आहे. त्यामुळे मेडीकव्हर हाॅस्पीटल, संगमनेर, मधील महात्मा फुले जन आरोग्य योजनेचे कामकाज पाहणारे खाजगी इसम सुभाश धादवड व हाॅस्पीटलचे मॅनेजर सुजित गायकवाड यांचे विरोधात सर्वानुमते सापळा आयोजित करण्याचे ठरले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री पवार यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली त्यावेळी त्यांनी त्यांचेकडील 500 रूपये दराच्या 40 भारतीय चलनी नोटा अषी 20,000/- रूपये लाच रक्कम उपलब्ध केली. त्यानंतर मी तक्रारदार श्री पवार व पंचांना अॅन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाषात हिरवट रंगाची चकाकी दिसलेबाबत खात्री करून दिली. त्यानंरत सापळा कारवाईचे अनुशंगाने सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही केलेनंतर अॅन्थ्रासिन लावलेले 20,000/- रूपये तक्रारदार यांचे षर्टचे समोरील डावे बाजुच्या खिषामध्ये पोकाॅ. गायकवाड यांनी ठेवुन दिल्या.त्यानंतर तक्रारदार श्री पवार, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुशंगाने सुचना देत असतानाच तक्रारदार श्री. पवार यांना त्यांचे मामा विलास कु-हाडे यांनी कळविले की, त्यांनी तक्रारदार यांचे आईचा 20000/- रूपये देवून डिस्चार्ज करून घेतला आहे. त्यावेळी तक्रारदार श्री पवार यांनी कळविले की, माझ्या आईचा डिस्चार्ज करून घेतल्याने मेडिकव्हर हाॅस्पीटल मधील महात्मा फुले जनआरोग्य योजनेचे काम पाहणारे सुभाष धादवड, बिलींग विभागामधील कर्मचारी व मॅनेजर सुजित गायकवाड हे लाचेची रक्कम स्विकारणार नाही तसेच माझी आई वयस्कर असलेने व आजारपणामुळे ती चिडचिड करत असल्यामुळे तक्रारदार यांना तिच्या सोबत घरी राजुरी ला जाणे गरजेचे आहे, त्यामुळे आज पावेतो झालेल्या कार्यवाहीवरून मेडिकव्हर हाॅस्पीटल, संगमनेर, मधील महात्मा फुले जन आरोग्य योजनेचे कामकाज पाहणारे श्री सुभाश धादवड व मॅनेजर सुजित गायकवाड यंाचे विरूध्द योग्य ती कायदेषिर कारवाई करण्यात यावी. त्यानंतर सदरची कारवाई पुर्णतः स्थगित करण्यात आली.

तरी मेडीकव्हर हाॅस्पीटल, संगमनेर, जि. अहिल्यानगर मधील महात्मा फुले जन आरोगय योजनेचे कामकाज पाहणारे सुभाश धादवड यांनी दि.22/05/2025 रोजी 15/45 ते 16/04 वा.चे दरम्यान मेडीकव्हर हाॅस्पीटल, संगमनेर, जि. अहिल्यानगर येथे लाच मागणी पडताळणी कारवाई च्या वेळी पंच नं.1 श्री रूद्रवंषी यांचे समक्ष सुभाश धादवड यांनी तक्रारदार यांच्या आईचे आॅपरेषन व उपचार महात्मा फुले जन आरोग्य योजनेमध्ये करून देणेकरीता 20,000/- रूपये दयावे लागतील व सदर पैसे दिल्याबाबतचे बिल भेटणार नाही असे सांगुन सुभाश धादवड यांनी लाच मागणी करून सदरची लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्षविली. तसेच सदरचे हाॅस्पीटलचे मॅनेजर सुजित गायकवाड यांच्याकडे बिलाबाबत विचारणा केली असता मॅनेजर सुजित गायकवाड यांनी सांगितले की, जे ठरले आहे

त्यात कमी होणार नाही. असे म्हणुन सुभाश धादवड यांच्या लाचमागणीस प्रोत्साहन दिले असल्याचे व्हाईस रेकाॅर्डमधील मेमरीकार्डमध्ये रेकाॅर्ड झालेले असुन ते पडताळणी पंचनामा स्क्रिप्टमध्ये नमुद आहे. सदरची महात्मा फुले जन आरोग्य योजना ही महाराश्ट्र षासनाकडुन सुरू करण्यात आलेली आहे. सदर योजना ही महाराश्ट्र षासन खाजगी हाॅस्पीटल मार्फत राबवते. या योजनेचे पात्र लाभार्थी तेथे उपचार घेवुन व उपचार घेतल्यानंतर खर्च हाॅस्पीटलला महाराश्ट्र षासनामार्फत दिला जातो. हे मेडिकव्हर हाॅस्पीटल, संगमनेर, ( सह्दय हेल्थ केअर प्रा.लि. संगमनेर. जि. अहिल्यानगर ) देखील या योजनेमध्ये समाविश्ठ करण्यात आलेले आहे. म्हणजेच महाराश्ट्र षासनातर्फे सदरच्या हाॅस्पीटलला सर्व कर्तव्य नेमुन देण्यात आले होते. म्हणुन सदरील हाॅस्पीटल मधील कर्मचारी हे भ्रश्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 2(सी) 8, 12 प्रमाणे लोकसेवक आहेत म्हणुन माझी मेडीकव्हर हाॅस्पीटल, संगमनेर, जि. अहिल्यानगर मधील महात्मा फुले जन आरोग्य योजनेचे कामकाज पाहणारे 1.श्री सुभाश दगडु धादवड, वय-29 वर्शे, धंदा-डाटा इंन्ट्री आॅपरेटर, मेडीकव्हर हाॅस्पीटल, संगमनेर, हल्ली रा. घुलेवाडी फाटा, राजापुर रोड, राउत मळा, पदमिनी हाॅटेल षेजारी, ता.संगमनेर, जि. अहिल्यानगर, व सदर हाॅस्पीटलचे मॅनेजर 2.श्री सुजित दामोदर गायकवाड, वय-34 वर्शे, धंदा -ऑपरेषन मॅनेजर, मेडीकव्हर हाॅस्पीटल, संगमनेर, हल्ली रा. हिरा षंकर निवास, वेदास हाॅटेल जवळ, मालवड रोड, संगमनेर, ता. संगमनेर, जि.अहिल्यानगर मुळ रा.आष्वी खुर्द, ता.संगमनेर, जि. अहिल्यानगर यांचे विरूध्द भ्रश्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 (अ), 12 प्रमाणे कायदेषिर फिर्याद आहे.

माझी वरील संगणकावर टंकलिखीत केलेली फिर्याद मी वाचुन पाहिली ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष, हि फिर्याद दिली.

(श्रीमती छाया देवरे,
(पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.अहिल्यानगर)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

sameer navnath baravkar(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



CS CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

4) Transferred to P.S.
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):
on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

पोलीस ठाणे अमलदार
संगमनेर शहर पोलीस स्टेशन

Registered by (नोंदणी अधिकारी)

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): sameer navnath ba
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.):

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):



CS CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(से. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | मजबुत | 165.1-165.1 | गोरा | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**



CamScanner